## प्रेस नोट

### घरफोडी चोरी करणारे सराईत गुन्हेगार गुन्हे शाखा, युनिट २ कडुन जेरबंद

पुणे शहरात घरफोडीच्या गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त श्रीमती रश्मी शुक्ला यांनी घरफोडी होणारे ठिकाणी भेट देवून सदर भागात सतर्क पेट्रोलिंग ठेवून घरफोडी करणारे रेकॉर्ड वरील गुन्हेगार चेक करुन घरफोडीच्या गुन्हयांना प्रतिबंध करावा असे आदेश दिल्याने गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री सतिश निकम यांनी त्यांचे युनिट चे कर्मचाऱ्यांचे यांना भारती विदयापीठ, सिंहगड, सहकारनगर भागात वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याकरीता नेमण्यात आले होते.

दि. २१/११/२०१७ रोजी सिंहगड पोलीस स्टेशन हद्दीत सन युनिव्हर्स, नवले ब्रिज शेजारी या सोसायटीमध्ये फिर्यादी सौ विदया बोरा यांचे घरी दिवसा घरफोडी झालेली होती. सदर वेळी त्यांचे एकुण ३९ तोळे सोन्याचे दागिने चोरी झालेले होते. सदर घरफोडी दिवसा करण्यात येवून सदर सोसायटीमध्ये वॉचमन व सीसीटिव्ही फुटेज असताना चोरटयांनी सोसायटीमध्ये प्रवेश करुन घरफोडी केली असल्याने पोलीसांसमोर तपासाचे आव्हान असल्याने गुन्हे शाखा युनिट २ कडील पोलीस निरीक्षक सतिश निकम, सपोनि अन्सार शेख यांनी सदर सोसायटीतील वॉचमन यांचेकडे सखोल तपास करुन सीसीटिव्ही फुटेज चेक केले असता सदर सीसीटिव्ही फुटेजमध्ये २ संशयीत व्यक्ती फिर्यादीचे बिल्डींगमध्ये प्रवेश करताना व बाहेर पडताना दिसून आल्याने सदर लोकांवर तपासाची दिशा केंद्रीत करुन गुन्हा घटलेल्यावेळेप्रमाणे घटनास्थळाचे आजूबाजूचे परिसरातील सीसीटिव्ही फुटेज चेक केले असता सदरचे आरोपी हे गुन्हा करुन हायवेने नवलेब्रीज येथे जावून त्या ठिकाणाहून सहा आसनी रिक्षात बसून कात्रज चौक पर्यंत आलेची माहिती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने कात्रज चौक, संतोषनगर, आंबेगाव, भागात वेगवेगळी पथके नेमून संशयित आरोपीचा शोध घेत असताना सदर गुन्हयातील एक संशयीत आरोपी संतोषनगर मधील बाजारात फिरत असल्याचे पोलीस नाईक अनिरुध्द सावर्डे यांना दिसले. सीसीटिव्ही फुटेजचे मिळालेल्या माहिती व वर्णनावरुन सदर इसम हा घरफोडीतील संशयित इसम असल्याची खात्री झाल्याने त्यांनी त्यास ताब्यात घेवून सदर भागात तपासकामी उपलब्ध असलेले पोलीस निरीक्षक सतिश निकम व पोहवा गडांकुश, पोना वग्गु, महाजन यांना फोन व्दारे माहिती दिली त्याप्रमाणे सर्वजण संतोषनगर भागात येवुन सदर संशयित इसमाकडे चौकशी करुन त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **इदानूर रहेमान राकिब, वय ६२, सध्या रा. बॉम्बे बिल्डीग, गल्ली नं. ३, संतोषनगर, कात्रज पुणे, मूळ राहणार - गाव सारोकिया हाजीपाडा, तहसिल - डेमरा, जि. ढाका, बांगलादेश** असे सांगितले. त्यावेळी त्याचेकडे चौकशी करता त्याने गुन्हयाची कबुली देवून त्याचा दुसरा साथीदार हा सध्या राहतो त्या खोलीत असून चोरी केलेला मालही सदर खोलीत ठेवल्याचे सांगितल्याने सदर इसमास ताब्यात घेवून गल्ली नं. ३ येथे जावून त्याचा साथीदारास ताब्यात घेवून नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **जाकिर कोबिद हुसेन, वय ४२, सध्या रा. बॉम्बे बिल्डींग, गल्ली नं. ३, संतोषनगर, कात्रज पुणे, मूळ राहणार - गाव - मोदीपाडा बाजार, तहसिल - कोतवाली, जि. दिशेनपूर, बांगलादेश** असे सांगितले. तेव्हा त्यांचे खोलीतुन सोन्याचे दागीने व गुन्हा करण्यासाठी वापरलेली काळया रंगाची बॅग व एक लोखंडी कटावनी जप्त करण्यात आले असुन त्यामध्ये सिंहगड पोलीस स्टेशन गुरनं. ३६७/२०१७, भादवि क. ४५४,३८० यामध्ये चोरी केलेल्या दागिण्याव्यतिरिक्त आणखीन दागिने मिळून आल्याने त्याबाबत चौकशी केली असता सदर दोघांनी सहकारनगर व बिबवेवाडी या ठिकाणी चोरी केल्याचे कबुल करुन ती ठिकाणे दाखविले. त्याठिकाणाबाबत खात्री केली असता

१) सिंहगड पोलीस स्टेशन गुरनं. ३६७/२०१७, भादवि क. ४५४,३८० (३९० ग्रॅम)
२) बिबवेवाडी पोस्टे गुरनं. ३३२/२०१७, भादवि क. ४५४,३८० (१३ ग्रॅम )
३) बिबवेवाडी पोस्टे गुरनं. ३३१/२०१७, भादवि क. ४५४,३८०,५११
४) सहकारनगर येथे ३४१/२०१७, भादवि क. ४५४,३८० (९ ग्रॅम )

असे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

अशा प्रकारे सदर आरोपींच्या कब्जातून एकुण ४ गुन्ह्यातील ३३७ ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत रुपये ०९,७७,३०० /- व ६०० ग्रॅम चांदी किंमत रुपये २४,०००/- असा एकुण १०,०१,३००/- रुपये इतक्या रकमेचा मुद्देमाल गुन्हा घडलेपासुन ७ दिवसात हस्तगत करण्यात गुन्हे शाखा युनिट २ यांना यश आलेले आहे.

सदरचे आरोपी हे सराईत घरफोडी करणारे आरोपी असुन सन २०१५ मधे त्यांना चंदननगर पोलीस स्टेशनच्या ७ गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली होती. सदर गुन्ह्यात ते जून २०१७ रोजी जामीनावर सुटल्यानंतर कोंढवा येथे घरफोडी करीत असताना त्यांना पकडण्यात आले होते. त्यांचेकडून कोंढवा व हडपसर पो.स्टेचे प्रत्येक १ असे २ घर फोडीचे गुन्हे उघडकीस आले होते. सदर गुन्ह्यामधून अ.क्र. १ हा दि. ०२/११/२०१७ रोजी व अ.क्र. २ हा दि. ०६/११/२०१७ रोजी जामीनावर सुटले असुन त्यानंतर त्यांनी कात्रजचे संतोषनगर भागात आश्रय घेवुन घरफोडी चोरी करण्यास सुरवात केली होती.

यातील आरोपी क्र. १ हा विना व्हिसा द्वारे भारतात प्रवेश केला आहे. व आरोपी क्र. २ हा दि. ०३/०६/२०१७ रोजी एक महिन्याचे प्रवासी व्हिसावर भारतात प्रवेश केला असुन तो परत न जाता भारतातच राहुन घरफोडी चोरी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री प्रदिप देशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे, सहा पोलीस आयुक्त, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक सतिश निकम, सपोनि अन्सार शेख, पोलीस कर्मचारी राजकुमार तांबे, सुरेश उगले, राजु केदारी, सिराज शेख, दिनेश गडांकुश, अजय खराडे, अनिरुध्द सावर्डे, विशाल भिलारे, अतुल गायकवाड, किशोर वग्गु, अजित फरांदे, प्रसाद जंगिलवाड, चंद्रकांत महाजन, गणेश नरुटे यांनी केलेली आहे.




पुणे शहर पोलीस
गुन्हे शाखा,
युनिट १,
ची कामगिरी